जनसंपर्क कक्ष
17 APR 2026 क्रांतीसिंह शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शासनाच्या कृतीशीलतेमुळे क्रीडापटूंना स्थैर्य

सांगली(प्रतिनिधी):- क्रीडाक्षेत्र हा करिअरचा सक्षम पर्याय म्हणून सामोरा येत असून महाराष्ट्र शासनाच्या सकारात्मक व कृतिशील धोरणामुळे येथील राज्यातील क्रीडापटूंना स्थैर्य आणि सन्मान प्राप्त होत आहे. विविध क्रीडा प्रकारांत उत्तुंग कामगिरी करणाऱ्या ३७२ खेळाडूंना महाराष्ट्र शासनाच्या सेवेमध्ये विना परीक्षा थेट सामावून घेण्यात आले आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी येथे केले.

भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांचे उद्घाटन मंत्री पाटील यांच्या हस्ते येथील कै. वसंतदादा पाटील स्मृती स्मारक, कृष्णा नदीवरील रॉयल बोट क्लब येथे झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार धनंजय उर्फ सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, कलापि उद्योगाचे योगेश लोहकरे, अधिसभा सदस्य संजय परमणे, काव्यश्री नलवडे आदी उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, क्रीडा क्षेत्रात करिअर घडविणाऱ्या तरुणांसाठी महाराष्ट्र शासनाने मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहनपर धोरणे लागू केली आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळविणाऱ्या खेळाडूंना थेट वर्ग एकची शासकीय



नोकरी, राष्ट्रीय स्तरावर सुवर्ण पदक विजेत्यांना वर्ग दोन, तर राज्य स्तरावरील विजेत्यांना वर्ग तीन व चारची पदे देण्याचा निर्णय शासनाने घेतला. याशिवाय, क्रीडापटूंना आर्थिक बळ देण्यासाठी आकर्षक रोख पारितोषिकांची तरतूद करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्यांना रुपये २ कोटी, राष्ट्रीय स्तरावर रुपये एक कोटी आणि राज्य स्तरावर रुपये ५० लाख इतकी बक्षिसे दिली जात आहेत.

यावेळी त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवणाऱ्या तेजस्विनी सावंत यांचे पालकत्व घेतल्याचा उल्लेख करत क्रीडापटूंना शासनाकडून दिल्या जाणाऱ्या पाठबळाचे महत्त्व अधोरेखित केले.मंत्री पाटील यांनी पुढे सांगितले की, भारत सन २०३६च्या ऑलिंपिक स्पर्धेसाठी सज्ज होत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात जागतिक दर्जाच्या क्रीडा पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, शिवाजी विद्यापीठाला शिक्षण, संशोधन आणि क्रीडा क्षेत्रातील सहा दशकांची समृद्ध परंपरा लाभली असून क्रीडा क्षेत्रातही विद्यापीठ अग्रस्थानी आहे. कृष्णा नदीवरील स्पर्धेचा ट्रॅक हा शास्त्रीयदृष्ट्या अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असून पाण्याचा प्रवाह स्थिर असल्यामुळे सर्व स्पर्धकांना समान संधी मिळते. देशात क्वचितच आढळणारा सुमारे ९४० मीटरचा सरळ व अडथळेमुक्त ट्रॅक ही या कृष्णा नदीतील स्पर्धास्थळाची खास वैशिष्ट्ये असल्याचे सांगत त्यांनी सर्व सहभागी खेळाडूंना उत्कृष्ट क्रीडा स्पर्धात्मकतेसह सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले.

सुरवातीला मंत्री पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प हार अर्पण करून अभिवादन करून आणि ध्वजारोहण करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. तसेच, प्रदर्शनीय सामन्यांना मंत्री पाटील यांच्या हस्ते फ्लॅग ऑफने प्रारंभ केला.

क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. महादेव ठोंबरे, सोनाली पाटील व डॉ. श्रीदेवी पवार-हिरुगडे यांनी सूत्रसंचालन केले, तर अधिसभा सदस्य श्रीनिवास गायकवाड यांनी आभार मानले.

17 APR 2026

जनप्रवास

# विद्यापीठाच्या विविध १०८ अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरळीत

- तीन जिल्ह्यात मिळून १७ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद
- सर्वाधिक प्रकरणे ८ कोल्हापूर जिल्ह्यातील



**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल - २०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा १ एप्रिलपासून सुरळितपणे सुरु झालेल्या आहेत. गुरुवारीही विविध अभ्यासक्रमाच्या परीक्षा १६६ परीक्षा केंद्रावर पार पडल्या. दरम्यान, भरारी पथकाकडून तिन जिल्ह्यात मिळून १७ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद करण्यात आली आहे.

या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. १६ एप्रिलरोजी या पथकाकडून कोल्हापूर - ८, सांगली- ४ व सातारा - ५ अशा एकूण १७ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आलेली आहे. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे. सदर परीक्षांसाठी ७०,६६६ विद्यार्थी उपस्थित होते.

17 APR 2026
सकाळ

# शिवाजी विद्यापीठ आता 'राज्य सार्वजनिक विद्यापीठ'

**सकाळ वृत्तसेवा**

| इतर विद्यापीठांची आकडेवारी | |
|---|---|
| स्वतंत्र अधिनियम असणारी विद्यापीठे | ४ |
| समूह विद्यापीठे | ४ |
| अभिमत (अनुदानित) | ३ |
| विधी | ३ |
| तंत्रज्ञान | ३ |
| डिनोव्हा | १ |

कोल्हापूर, ता. १६ : दक्षिण महाराष्ट्राची ज्ञानगंगा असलेल्या शिवाजी विद्यापीठाला आता शासनपातळीवर 'राज्य सार्वजनिक विद्यापीठ' असे संबोधले जाणार आहे. 'अकृषि विद्यापीठ' म्हणून यापुढे उल्लेख होणार नाही. राज्यातील एकूण अकरा विद्यापीठांबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्णय घेतला आहे.

उच्च शिक्षण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असणाऱ्या पारंपरिक विद्यापीठांना अकृषी विद्यापीठे असे संबोधले जात होते. मात्र, उच्च शिक्षण विभाग, कृषी व पदूम विभागासहीत वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालीही राज्यात विद्यापीठे कार्यरत आहेत. ते लक्षात घेता अकृषी विद्यापीठे असा शब्दप्रयोग योग्य ठरणार नाही. त्यामुळे उच्च शिक्षण विभागाने या पारंपरिक विद्यापीठांचा यापुढे 'राज्य सार्वजनिक विद्यापीठे' असा उल्लेख करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाला यापुढे संबोधले जाणार आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारितील अकरा विद्यापीठांचा उल्लेख राज्य सार्वजनिक विद्यापीठे असा करण्याचा निर्णय झाला आहे. त्याबाबत शासन निर्णयानुसार शिवाजी विद्यापीठासह कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल.

**- प्रकाश बच्छाव**, सहसंचालक, उच्च शिक्षण कोल्हापूर विभाग

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 APR 2026
सकाळ

# महाराष्ट्र पालख्या उचलतो ज्ञानोबा-तुकोबांच्या

## इंद्रजित देशमुख : माझ्यामुळेच जग चालते, हा समज चुकीचा

**सकाळ वृत्तसेवा**

### बसव व्याख्यानमाला

कोल्हापूर, ता. १६ : सत्ता, संपत्ती, पद, प्रतिष्ठा असलेल्यांच्या पालख्या कोण उचलत नाही, तर अवघा महाराष्ट्र हा ज्ञानोबा-तुकोबा यांच्या पालख्या उचलतो, त्यांचे स्थान अजरामर आहे, असे ज्येष्ठ विचारवंत इंद्रजित देशमुख यांनी आज येथे सांगितले. माझ्यामुळेच जग चालते हा समज चुकीचा आहे, आपण नसल्यावरही जग छान चालते, असेही त्यांनी सांगितले.

शाहू स्मारक भवन येथे शिवाजी विद्यापीठाच्या शरण साहित्य अध्यासन व बसव केंद्र आयोजित बसव व्याख्यानमालेत 'अमृतानुभवातील चिंतन' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जी. पी. माळी होते. प्रमुख उपस्थिती अध्यासन समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी, विलास आंबोळे, सुभाष महाजन आदींची होती. देशमुख म्हणाले, 'आपल्यातील सामर्थ्याचा व वेळेचा वापर हा अवताल-भवतालच्या गरजूंसाठी करावा, असा बसवाण्णांचा संदेश आहे. संतांची वाणी अतिशय साधी व सोपी सर्वसामान्यांना कळेल अशी असते. अवघड गोष्ट सोपी करून सांगण्याचे काम संत करत असतात. संतांच्या मते जीव म्हणून जितके दिवस आपल्याला मिळालेत, तितकेच आपण जगणार आहोत.' आनंदापर्यंत जाण्यासाठी अज्ञानातून ज्ञानाकडे, सुख-दुःखाकडून सुखरुपाकडे, स्वकर्तृत्वाकडून ईश्वरी कर्तृत्वाकडे, क्रिया शून्यतेकडून क्रियाशीलतेकडे, आसक्तीकडून अनासक्तीकडे, बंधनाकडून मोक्षाकडे गेले पाहिजे. संतांच्या चेहऱ्यावर कायम आनंद असतो. संत जिथे जातात तिथे आनंद पेरून स्नेह निर्माण करतात, असे देशमुख यांनी सांगितले.



कोल्हापूर : बसव व्याख्यानमालेत बोलताना इंद्रजित देशमुख.

### देशमुख म्हणाले...

- संतांचे स्थान अजरामर
- संत दुसऱ्याच्या कल्याणासाठी स्वतःचा प्राण त्यागतात
- संत भेटता होई आयुष्याचे कल्याण
- उत्कृष्ट आनंद म्हणजे ब्रह्मानंद
- विकार, इंद्रियात आनंदाचा वास

### आजचे व्याख्यान

- वक्ते : धनाजी गुरव (ईश्वरपूर)
- विषय : शरण संकुल आणि सत्यशोधक समाज
- अध्यक्ष : डॉ. भारती पाटील
- वेळ : सायंकाळी सहा

यश आंबोळे यांनी प्रास्ताविक केले. संध्या व्हनगुत्ती यांनी सूत्रसंचालन केले. शुभांगी चितारी यांनी आभार मानले.

1 7 APR 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संत परंपरेतून नैतिकता, समता, भक्तीची शिकवण

## इंद्रजित देशमुख यांचे प्रतिपादन : बसव व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आयुष्याचा अर्थ मांडणारी संताची वाणी आहे. संताचे स्थान अजरामर आहे. संत परंपरेने समाजाला नैतिकतेची, समतेची आणि भक्तीची शिकवण दिली. सात शतकांहून अधिक काळ चाललेली ही संतांची परंपरा आजही समाज जीवनाला दिशा देणारी आहे, असे प्रतिपादन माजी सनदी अधिकारी इंद्रजित देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, शरण साहित्य



अध्यासन आणि बसव केंद्रातर्फे महात्मा बसवण्णा यांच्या जयंतीनिमित्त आयोजित बसव व्याख्यानमालेत त्यांनी दुसरे पुष्प गुंफले. प्राचार्य डॉ. जी. पी. माळी अध्यक्षस्थानी होते. राजर्षी शाहू स्मारक भवनात कार्यक्रम झाला.

अमृतानुभवातील चिंतन या विषयावर देशमुख यांनी ज्ञानेश्वरी आणि तत्सम

### आजचे व्याख्यान

वक्ते : धनाजी गुरव
विषय : शरण संकुल आणि सत्यशोधक समाज. वेळ : सायंकाळी ६ वाजता
स्थळ: राजर्षी शाहू स्मारक भवन, मिनी सभागृह

आध्यात्मिक ग्रंथांचे दाखले देत पुष्प गुंफले. ते म्हणाले, महाराष्ट्राला आजही संताची वाणी महत्वाची आहे. कारण तिने शतकानुशतके समाजाला नैतिकतेची, समतेची आणि भक्तीची शिकवण दिली आहे. सात शतकांहून अधिक काळ चाललेली ही संतांची परंपरा आजही समाजजीवनाला दिशा देणारी आहे. संपत्ती, सत्ता, प्रतिष्ठा, मान-सन्मानापेक्षा महाराष्ट्रात संत तुकाराम, ज्ञानदेव महाराजांच्या पालखी भाविक उचलतात, ही भूषणावह गोष्ट आहे. जीवनाची धन्यता ही त्यांच्याच वाणीतून आजही महाराष्ट्राला कळते. विचार, कर्म आणि भोगप्रधान अशा तीन वृत्तीचे लोक समाजात आहेत. भौतिक आनंदापेक्षा आध्यात्मिक आनंद मिळविण्यासाठी मनुष्याने धडपड करण्याची गरज आहे.

यावेळी समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी, विलास आंबोळे, सुभाष महाजन आदी उपस्थित होते. यश आंबोळे यांनी स्वागत. संध्या व्हनगुत्ते यांनी सूत्रसंचालन केले. शुभांगी चितारी यांनी आभार मानले.

1 7 APR 2026

तरुण भारत

# पदवी, पदव्युत्तर परीक्षेत १७ गैरप्रकार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल- २०२६ या उन्हाळी शैक्षणिक सत्रातील गुरूवारी झालेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षेत १७ गैरप्रकारांची नोंद करण्यात आली. या गैरप्रकारांमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील ८, सांगली जिल्ह्यातील ४ व सातारा जिल्ह्यातील ५ इत्यादी गैरप्रकारांचा समावेश आहे. काल गुरूवारी विविध विद्यापीठाच्या १०८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने १६६ परीक्षा केंद्रावर पार पडल्या आहते. सदर परीक्षांसाठी ७० हजार ६६६ विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेसाठी शिवाजी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विविध भरारी पथके स्थापन केली आहेत. या पथकांकडून ही कारवाई करण्यात आली. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी सर्व विद्यार्थ्यांना केले आहे.